CoverageReport: TCS IT Wiz – Nagpur Edition

**Publication:**LokshahiVarta
**Date:** 20/09/2014
**Edition:** Nagpur
**Page No:** 12
**Headline:**Center Point School, wins TCS IT WIZ

# ‘टीसीएस आयटी विझ’ फेरीचे विजेतेपद सेंटर पॉईटने पटकावले

## महाअंतिम फेरीत नागपूर शहराचे करणार प्रतिनिधित्व

लोकशाही वार्ता / नागपूर

डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित टीसीएस आयटी विझमध्ये नागपुरील विविध शाळांमधील १२ पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. माहिती तंत्रज्ञान सेवा, सल्ला व व्यावसायिक सुविधा सेवा प्रदान करणारी आघाडीची कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हीसेसने टीसीएस आयटी विझ या भारतातील सर्वात मोठ्या आंतरशोल आयटी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले.

विभागीय फेरीत दमदार कामगिरी करीत ‘सेंटर पॉईंट स्कूल काटोल रोड यांनी विजेतेपद पटकावले. विजेत्यांना प्रत्येकी एक आयपॅड एअर बक्षिस म्हणून देण्यात आला. ‘एसएफएस-ज्युनिअर कॉलेज सेमिनरी हिल्स यांनी या क्वीझचे उपविजेतेपद पटकावले. त्यांना प्रत्येकी एक मिनी आयपॅड देण्यात आला. यासोबतच ट्रॉफी व मेडलसुद्धा देण्यात आले. अंतिम फेरीतील सहा जणांना टीसीएसकडून अनेक बक्षिसे देण्यात आली. टीसीएस बीपीएस सर्व्हीसेसचे उपाध्यक्ष व ग्लोबल एचआर हेड राजन बंडोपाध्याय यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या क्वीझमध्ये जगभरात सध्या अतिशय प्रसिद्ध खास तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात आला. सहभागी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान समजून घेता आले.




आठवी ते बारावी विद्यार्थी टीसीएस आयटीमध्ये भाग घेऊ शकतात. ही स्पर्धा निःशुल्क आहे. विद्यार्थ्यांना सोशल मीडियामार्फत क्वीझमध्ये सहभागी करवून घेण्यासाठी ट्विटर कॉन्टेस्टचेही आयोजन करण्यात आले होते. अंतिम फेरीतील स्पर्धकांनी ट्विट केले. त्यामध्ये यशस्वी दोन विजेत्यांना एक कॅप व ब्ल्यूटुथ स्पीकर्स बक्षिस म्हणून देण्यात आले. १४ शहरांमधून सर्वात जास्त ट्वीट गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला टीसीएस आयटी विझची महाअंतिम फेरी पाहण्यासाठी मुंबईची सहल मोफत करता येईल. प्राथमिक लेखी परीक्षेत सर्व संघांना स्पर्धेच्या ठिकाणी २० प्रश्न सोडवायचे होते. यामध्येय यशस्वी सहा सर्वोत्कृष्ट संघांना विभागीय फेरीत सहभागी होण्याची संधी मिळाली. विभागीय फेरीचे मुख्य आकर्षण फ्लिपबोर्डींग, ड्रोनिंग, डिसरप्टीव थिंकींग, सो लो मो, टीसीएस आदी फेऱ्या होत्या.